महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये कर्तव्यार्थ असताना जखमी अथवा मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/ग्रापंनि-२०२२/प्र.क्र.०९/का.८
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०२ जानेवारी,२०२३

## आदेश

विषय :- महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये कर्तव्यार्थ असताना जखमी अथवा मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.२४/का.०६, दि. २८ नोव्हेंबर, २०१६.
२) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र. सीईएल-२०१९/प्र.क्र.४७०/१९/३३, दि. ११ एप्रिल, २०१९ व दि. २ फेब्रुवारी, २०२१.

राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २८ नोव्हेंबर, २०१६ च्या आदेशान्वये ( संदर्भाधीन क्र. १) महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये कर्तव्यार्थ असताना जखमी अथवा मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानाचे दर निश्चित करण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांनी संदर्भाधीन क्र. २ येथील दि. ११ एप्रिल, २०१९ च्या शासन निर्णयान्वये भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या निवडणुकांमध्ये कर्तव्यार्थ असताना जखमी अथवा मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानामध्ये वाढ केली आहे. तसेच दि. २ फेब्रुवारी, २०२१ च्या शासन निर्णयानुसार निवडणूक

कर्तव्यार्थ असताना कोविड-१९ या आजारामध्ये मृत पावलेल्या अधिकारी / कर्मचारी यांच्या वारसांना रु.३०,००,०००/- इतके सानुग्रह अनुदान देय आहे. तसेच मतदान यंत्र तयारीच्या प्रक्रियेमध्ये नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दल अथवा ECIL च्या अधिकाऱ्यांना देखील सानुग्रह अनुदानाचा लाभ देय केला आहे. त्यास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाचे दि. २८ नोव्हेंबर, २०१६ चे आदेश सुधारीत करणे आवश्यक आहे असे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे.

२. वरील परिस्थिती महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये कर्तव्यार्थ असताना जखमी अथवा मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदानाचे दर खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | तपशील | सानुग्रह अनुदानाचे सुधारीत दर |
|---|---|---|
| १ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना मृत पावलेले अधिकारी / कर्मचारी यांचे वारस | रु. १५,००,०००/- |
| २ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरिकी कारवाया, नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बॉम्ब स्फोट, सुरुंग पेरणी अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला (Road Mines, Bomb Blast, Armed Attacks etc.) यामध्ये तसेच निवडणूक कर्तव्यार्थ असताना कोविड-१९ आजाराने मृत पावलेले अधिकारी / कर्मचारी यांचे वारस | रु. ३०,००,०००/- |
| ३ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी / कर्मचारी (जसे हात/पाय/डोळा गमावणे इ.) | रु. ७,५०,०००/- |
| ४ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असताना अतिरेकी कारवाया, नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बॉम्बस्फोट, सुरुंग पेरणी अथवा शस्त्रास्त्रांचा हल्ला (Road Mines, Bomb Blast, Armed Attacks etc.) यात कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी / कर्मचारी (जसे हात/पाय/डोळा गमाविणे इ.) | रु. १५,००,०००/- |

३. सदर आदेशातील निवडणूक कर्तव्य याचा अर्थ संबंधित अधिकारी / कर्मचारी हे निवडणुकीच्या कर्तव्यासाठी आपल्या घरातून / कार्यालयातून बाहेर पडल्यापासून ते निवडणुकीशी संबंधीत कर्तव्ये पार पाडून आपल्या कार्यालयात / घरी परत येईपर्यंतचा कालावधी असा समजण्यात यावा. निवडणुकीशी संबंधित कर्तव्ये यामध्ये निवडणुकीच्या कामासाठी दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा देखील समावेश आहे. तसेच मतदान यंत्र तयारीच्या सर्व प्रकिये दरम्यान नियुक्त केलेले निवडणूक अधिकारी / कर्मचारी /

अभियंते यांना मतदान अधिकारी / कर्मचारी म्हणून समजण्यात यावे. त्यानुसार त्यांना या आदेशातील सानुग्रह अनुदानाचे लाभ अनुज्ञेय राहतील.

निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त अधिकारी / कर्मचारी यामध्ये केंद्र शासन, राज्य शासन, निमशासकीय इतर प्राधिकरण तसेच इतर खाजगी आस्थापना की ज्यातील अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा निवडणुकीच्या कामासाठी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत असे अधिकारी / कर्मचाऱ्यांसहित केंद्रीय सशस्त्र पोलीस दल CAPF व ECIL कंपनीचे अभियंते, अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश राहील.

४. राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांवरील खर्च हा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने करावयाचा असल्याने असे अनुदानाचे प्रस्ताव प्रकरणपरत्वे संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांनी मंजूर करावेत.

५. सदर आदेश तात्काळ लागू होतील.

(के. सुर्यकृष्णमूर्ती)
उप सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत-

१) सर्व विभागीय आयुक्त.
२) सर्व महानगरपालिका आयुक्त.
३) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).
४) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा व नगरपंचायती.